# परिशिष्ट

लेखक नामदेव चंद्रभान कांबळे यांचे छायाचित्र



लेखक नामदेव चंद्रभान कांबळे यांची अभ्यासक श्री.जाधव मुलाखत घेत असताना.



लेखक नामदेव चंद्रभान कांबळे यांच्या साहित्यकृतींना मिळालेले पुरस्कार



# नामदेव कांबळे यांची घेतलेली मुलाखत

मी विश्वजित जाधव, सातारा (एम ए बी एड् ) मराठी.

**प्रश्न – १ सर, मी तुमच्या कादंबरी लेखनावर एम्. फिल्. करीत आहे. त्यादृष्टीने मी तुमची मुलाखत घेत आहे. मला आपले जीवन चरित्र थोडक्यात सांगा.**

* माझे पूर्ण नाव नामदेव चंद्रभान कांबळे. माझे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माझ्या गावीच झाले असून त्यानंतर मी नागपूर विद्यापीठात बी.एस्सी. भाग १ करुन तेथील एम.बी.बी.एस. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मात्र तेथील शिक्षण न झेपल्यामुळे तेथून मी परतलो. तेथून परत आल्यावर काही दिवस बेकारीत गेल्यानंतर वॉचमन म्हणून काम केले. पुढील काळात बी.ए.बी.एड्. करुन वाशीम येथे शिक्षकाची नोकरी करीत आहे.

**प्रश्न – २ सर, सध्या तुम्ही चांगले साहित्यिक आहात, तुम्हांला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. तर तुमचा आवडता साहित्य प्रकार कोणता ?**

* तसा मला मनातून कविता हा साहित्यप्रकार आवडतो. कविता हा हृदयाला भिडणारा, स्पर्श करणारा साहित्य प्रकार आहे. कवितेमधून माणूस अधिक व्यक्त होतो म्हणून कविता प्रकार मला आवडतो. मी सुरुवातीच्या काळात कविता लिहिल्या अजूनही कविता लेखन करीत आहे. मात्र कवितेपेक्षा कादंबरीमध्ये मी इस्टॅब्लिश झालो आहे. म्हणून तर मास्टरी मिळवलेनंतर तिकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. अशा प्रकारे धारणा अस्तित्वात आली. त्या पध्दतीने गेल्यावर माणसाला पुढची वाटचाल सापडते. म्हणून मी कादंबरीकडे वळलो.

**प्रश्न – ३ सर, माझा एम.फिल.चा विषय तुमच्या कादंबरी साहित्य प्रकारावर आहे. तर कादंबरी लेखनाचा विचार करता अपले आवडते कादंबरकार कोण आहेत ?**

* माझे आवडते कादंबरीकार वि स खांडेकर, उध्दव शेळके, व त्यानंतर माझे समकालीन कादंबरीकार मला जे आवडतात त्यामध्ये विश्वास पाटील, रघुनाथ पठारे, रविंद्र शोभणे

आहेत. अलिकडे यावर्षी साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेले राजन गवस हे माझे समकालीन असून त्यांच्या कादंबऱ्या मला वाचायला आवडतात.

**प्रश्न – ४ सर, तुमच्या 'राघववेळ', 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबऱ्या दलित जीवनाचे चित्रण मांडणाऱ्या कादंबऱ्या आहेत. तर या कादंबरी लेखनाची प्रेरणा कशी मिळाली ?**

* मी जशा कविता लिहित होतो, कथा लिहित होतो, कादंबरी लिहिली. त्यावेळी मला असे वाटायला लागले की, आपण ज्या जातीमध्ये जन्माला आलो त्या जातीचे आपण काही तरी देणे लागतो आणि या जातीने भरपूर भोगले आहे, भोगते आहे. आज दलित समाज शिकतो आहे, त्यांच्यामध्ये त्रूटी काय आहेत ? त्यांच्यामध्ये काय कमी आहे ? त्यांना पुढे जायचे असेल तर त्यांचे जीवन काय आहे, हे जर खऱ्या अर्थाने त्यांच्यापर्यंत पोहचले तर कदाचित त्यांच्यातून तो वाट काढेल असे मला वाटते म्हणून मी या जातीच्या कथानकाकडे वळलो.

**प्रश्न – ५ आपल्या या कादंबरी लेखनातील 'वालंबी' ही महत्वपूर्ण आणि मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. ही तुमच्या कल्पनेतील आहे की तुम्ही पाहिली आहे ?**

* वालंबी ही दलित जीवनातील आहे. ती समाजामध्ये जगणारी, भोगणारी अशी आहे. दलित समाजामध्ये स्त्रीया महत्वाचा सहभाग आहे. इतर समाजातील स्त्री आई आहे आणि दलित समाजातील स्त्री ही माय असते. आई ही बापाच्या किंवा त्या कुटुंबप्रमुखाच्या छायेमध्ये दबलेली असते. तिला स्वतंत्र निर्णयक्षमता नसते, स्वतंत्र असे कर्तृत्व नसते. याउलट दलित समाजातील माय असते ती नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून संसाराचा गाडा ओढत असते, किंबहुना त्याच्यापेक्षा अधिक कष्ट करुन संसाराचा गोडा ओढत असते आणि आपल्या मुलांचे भवितव्य उभे करण्यासाठी म्हणजे भविष्य घडविण्यासाठी पुरुषापेक्षा जास्त महत्वाची भूमिका पार पाडत असते आणि दलित समाजातील अशी स्त्री मी पाहत असल्यामुळे वालंबीच्या रुपाने दलित समाजातील स्त्रीवर फोकस धरावा असे मला वाटल्यामुळे प्रमुख पात्र भूमिका, वालंबीच आले आहे.

**प्रश्न – ६ कादंबरी लेखनातील रघू हे तुमचे रुप आहे काय ?**

✼ नाही, कादंबरीतील रघू व नामदेव कांबळे हे वेगळे आहेत ज्यावेळी 'राघववेळ' ला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यावेळी अनेक लोकांनी प्रश्न केला ती कादंबरी नाही आत्मकथनपर कादंबरी आहे. पण हे कादंबरीलेखन माझे आत्मकथन निश्चितच नाही.

रघू हा मातंग समाजातील आहे व मी ही मातंग समाजातील आहे आणि रघू हा नामदेव कांबळे लोकांना वाटत असावे. मात्र रघू हा वेगळा आहे आणि मी हा वेगळा आहे ते कदाचित माझ्या आत्मकथनाचा भाग आल्यानंतर वाचकांच्या लक्षात येईल. परंतु तोपर्यंत तरी मला ठोस-पुरावा देता येणार नाही.

**प्रश्न – ७ तुमच्या कादंबरी लेखनातून मानवी भूकसूक्त मांडले गेले आहे तर या भूकसूक्ताबद्दल आपले मत काय आहे ?**

✼ भूक ही प्रगतीची जननी आहे, असे म्हटले जाते. कारण असे की, माणसाला भूक नसती तर त्याचा विकास आजच्या स्थितीमध्ये जो झाला आहे, तसा झाला नसता. ही मानवी उपजत प्रवृत्ती असल्यामुळे आणि दलित समाजाची भूक ही अधिक प्रभावी असल्यामुळे ती भूक तीन अंगाने कादंबरी लेखनातून आली आहे.

ज्ञानाची भूक, कुडीची भूक आणि पोटाची भूक या तीन अंगाने आली आहे. पोटाची भूक ही बऱ्याच काळापासून भोगतो. जोपर्यंत दारिद्र्य रेषेखाली जगणारा समाज आहे. माणूस माणसाच्या बरोबरीने येत नाही तो पर्यंत भूक अधिक प्रभावी राहणार आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाच्या मनामध्ये ज्ञानाची भूक जागी केली असल्यामुळे हा जो समाज शिकतोय त्याचा परिणाम किंवा प्रभाव या मातंग समाजावर पाहिजे. मला वाटले अलिकडची नवी पिढी शिकतेय ती मी पहात होतो, तिच्यामध्ये रघूच्या निमित्ताने किंवा रघूच्या माध्यमातून ज्ञानाची भूक मी उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. राहता राहिला तो कुडीचा प्रश्न. कुडीची भूक ही भावनेशी संबंधीत आहे. आपण आपली भावना चढू दिली तर ती भूक

प्रभावी होते आणि ताब्यात ठेवली तर ती भूक ताब्यात ठेवता येते. असे मी यासाठी म्हणतो की, वालंबी ही विधवा असून सुध्दा आपल्या शरीराची भूक ती मारते आणि समाजामध्ये अशा असंख्या स्त्रीया असतात की, समाजात जगत असताना एक चांगली स्त्री म्हणून ती जगण्याचा प्रयत्न करत असते. ती समाजात कोणत्या भागात राहते आहे, हा महत्वाचा भाग नाही. वालंबी जशी सोशिक आहे, मुलांच्यासाठी काही तरी करत आपण एक विधवा असून सुध्दा स्वत: आपल्या कोणताही पाय ढळू न देता ती आपल्या शरीराची भूक मारण्याचा प्रयत्न करते. ती या दलित समाजातील एक आदर्श स्त्री म्हणून उभी राहते. असे मला वालंबीबद्दल एका वेगळ्या अर्थाने सांगावे वाटते.

**प्रश्न – ८ 'सांजरंग' कथानकात मराठवाडा नामांतराचा प्रश्न मांडला आहे. कादंबरीत तो प्रश्न गरज म्हणून आला की आपल्याला मांडावासा वाटला.**

* ती त्या कलाकृतीची नैसर्गिक गरज होती असे मी मानतो कारण 'सांजरंग' या कालखंडात आहे. ती नामांतर झाल्यानंतरच्या काळातील आहे. लॉगमार्च निघालेल्या कालखंडात आहे आणि दलित जीवनावर किंवा दलित पात्रावरची ती कादंबरी असल्यामुळे त्या कादंबरीमध्ये नामांतरचा विषय आला नसता तर मला वाटते त्या कलाकृतीवर माझेकडून अन्याय झाला असता. त्या पात्रावर अन्याय झाला असता. म्हणून ती नैसर्गिक गरज त्या कलाकृतीची ठरली आहे.

**प्रश्न – ९ सकस दलित नाट्य कमी लिहिले गेले आहे. दलित नाटकाकडे तुम्ही वळला आहे काय ? त्याच्याबद्दल तुम्ही काय म्हणाल ?**

* मध्यंतरीच्या काळात मी एकांकिका लिहिल्या. त्या प्रकाशित सुध्दा झाल्या. कधी काळी मला असे वाटायचे की आपण नाटककार व्हावे. पण नंतर लक्षात आले की, महेश म्हणून एक नाटककार आहेत आणि ते फार मोठे नाटककार आहेत आणि ते आमच्या शिरपूर जैनचे आहेत. मग माझ्या डोक्यात असा विचार आला की, महेश नाटक लिहित असताना किंवा

प्रस्थापित झाले असताना नामदेव कांबळेंनी नाटक लिहिले तर नामदेव कांबळेंच्या नाटकावर महेश यांची छाप किती हे लोक तपासून पाहतील. मग त्यापेक्षा आपण नाटक लिहिण्याचा आहे किंवा त्यामध्ये प्रस्थापित होण्याची अभिलाषा न बाळगता आपण वेगळा लेखन प्रकार हाताळला तर काय वाईट आहे. असा एक विचार करुन मी नंतरच्या काळामध्ये मी नाटकाकडे फारसा वळलो नाही कविता सोबत कथा लिहिल्या, कादंबऱ्या लिहिल्या त्याच्यामध्ये प्रस्थापित झाले आणि एक प्रकारची मास्टरी त्याच्यामध्ये मिळाली असे बाकीचे समजत असतील तर मला असे वाटते की, माझी जबाबदारी आहे की, तेच लेखन आपण अधिक जबाबदारीने हाताळले आहे त्यातून काही नवीन वाचकांना देता आले तर दिले पाहिजे. तेच पूर्ण केले पाहिजे.

**प्रश्न – १० आपण अलिकडच्या काळामध्ये काय लिहिले आहे व सध्या काय लिहित आहात ?**

* अलिकडच्या काळामध्ये मी एक नवीन कादंबरीचा संकल्प केला आहे आणि त्याला ज्येष्ठ नागरिकांचा चांगला सहभाग मिळतोय. चांगला प्रतिसादसुध्दा मिळतोय. मी असे जाहीर आवाहन केले होते की, जर मला वाशीम परिसरातील ज्याला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक या सगळ्या बाबीतून कसा कसा विकास होत गेला किंवा काय काय पडझड झाली असेल त्याची कारणे कोणती त्याच्यातून मला शोध घ्यायचा आहे. मला वाशीमच्या १९२० ते ७० वर्षांच्या कालखंडावर कादंबरी लिहावयाची आहे. या संदर्भातील ३७ प्रश्नांची प्रश्नावली ज्येष्ठ नागरिकांना दिल्यानंतर मला चांगले सहकार्य मिळत आहे. त्यातून वाशीम परिसराचा एक चांगला आलेख कादंबरीमधून उभा राहील. वाशीमचा कोणाला इतिहास पाहायचा असेल , कोणाला भूगोल पहायचा असेल, राजकारण तपासायचे असेल आणि समाजकारण तपासावयाचे असेल तर मला वाटते ही कादंबरी म्हणजेच या परिसराचा एक चांगला संदर्भ ग्रंथ होईल असा मला विश्वास वाटतो.

**प्रश्न – ११ साहित्याच्या निर्मितीमुळे आपणास आनंद मिळत गेला काय ?**

* याबद्दल असे म्हणता येईल जसे स्त्रीस बाळंतपण असते, गर्भारपणाचा त्रास असतो, लक्षणे असतात. बाळंतपणाच्या वेदना असतात. बाळंतपणानं तर सुटलेपणाची जी जाणीव असते. शब्दांच्या पलिकडचे समाधान असते जे शब्दामध्ये व्यक्त करता येत नाही. अशा प्रकारचे समाधान कोणत्याही लेखकाला होते आणि लेखन झाल्यानंतर प्रत्येक लेखकाला आनंद मिळत असतो. लाभत असतो तो आनंद मला मिळाला आहे.

**एखादा साहित्यिक समजला तर त्याचे साहित्य समजायला मदत होते. मुलाखतीत आपण विचारलेल्या प्रश्नांची मनमोकळेपणाने उत्तरे दिली. जे सहकार्य केले त्याबद्दल मी आपले आभार मानतो.**

* एखादे काम जोमाने केले तर अधिक चांगले आणि अधिक प्रभावी होते असे मला वाटते. तुम्ही प्रश्नावली माझ्यासमोर ठेवली ती अगदी चांगली प्रश्नावली आहे असे मला वाटते. त्यातून जो काही प्रबंध लिहिणार आहात प्रश्नावली पाहिल्यानंतर शितावरुन भाताची परीक्षा असे म्हणतात, त्यावरुनच मला असे वाटते की, तुमचे प्रबंध लेखन चांगले होईल. प्रबंध लेखनीय मार्गदर्शन तुमचे जे गाईड असतील ते करतीलच. हा भाग मार्गदर्शकावर सोपवावा.

मी विश्वजीत जाधव यांना त्यांच्या एम.फिल, प्रबंधासाठी दिलेली मुलाखत वाचली आहे व मी सदर मुलाखत स्वत: त्यांना दिली आहे.

# नामदेव कांबळेंची वाङ्मय सूची

**कविता संग्रह :-**

१) अकल्पित (१९८९) ज्ञानेश प्रकाशन, नागपूर.

२) तो · ती अन्वयार्थ (१९९९) देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे

३) प्रत्यय (१९९७), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**कथासंग्रह :-**

१) परतीबंद (१९९४), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

**कादंबरी :-**

१) अस्पर्श (१९९०), प्रितमसिंग जुनेजा, बुधवार पेठ, पुणे.

२) 'राघववेळ' (१९९३), देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे

३) उनसावली (१९९७), देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे.

४) मोराचे पाय (१९९७), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५) सांजरंग (१९९९), देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे.

६) शेलझाडा (        ), देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे.

**लेखसंग्रह :-**

१) स्मरण-विस्मरण (२०००) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

# नामदेव कांबळेंच्या कादंबरीविषय समीक्षात्मक लेखांची सूची

१) भगत दत्ता, 'राघववेळ, उनसावली आणि सांजरंग', आकलनाची एक वेगळी वाट, प्रतिष्ठान, नोव्हेंबर-डिसेंबर ९८.

२) घारे दिपक, 'मानाचे पान', ललित जून १९९४.

३) डॉ. शोभणे रविंद्र, 'सजग जाणिवेचा लेखक', विदर्भ विशेष, लोकसत्ता, २७-१२-९५.

४) दिवेकर सुवर्णा, 'मातंग समाजातील एका उगवाईची गोष्ट', केसरी, १५ फेब्रुवारी १९९८.

५) बेंडखळे अशोक, 'सुख-दु:खाची उनससावली', लोकप्रभा, १ जानेवारी १९९८.

६) सारडा शंकर, 'दलित तरुणाच्या आत्मभानाची आणि अस्मितेची जडणघडण रंगविणारी कहाणी : उनसावली', देशदूत, पुणे २४ ऑक्टोबर १९९८.

७) सानप किशोर, ''नामदेव कांबळेंच्या तीन कादंबऱ्या - 'राघववेळ', 'उनसावली' आणि 'सांजरंग', अनुष्टुभ, जानेवारी- फेब्रुवारी २०००.

८) प्रा. देशमुख सदानंद, 'नामदेव कांबळे यांची उनसावली', लोकसत्ता, ९-१-९८.

९) कांबळे नामदेव चं., 'मागे वळून पाहता,...... साहित्य सूची, मे ९७.

# संदर्भ ग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची


१ डॉ. अवसरीकर प्र. ना. , ''सामाजिक कादंबरी : स्वरुप आणि समीक्षा'', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती २००१.

२. कांबळे नामदेव, ''राघववेळ'', देशमुख आणि कंपनी, पब्लिशर्स प्रा. लि. ४७३, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती चवथी, फेब्रुवारी २०००

३. कांबळे नामदेव, ''उनसावली'', देखमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि. ४७३, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९९७.

४. कांबळे नामदेव, ''सांजरंग'', देखमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि. ४७३, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९९९.

५. कुंभार प्रकाश, ''दलित साहित्य : काही विचार काही दिशा'', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००२.

६. डॉ. कुलकर्णी मदन, ''मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप'', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती – प्रथम १९९४.

७ डॉ. कुलकर्णी श्री. मा, ''कादंबरीची रचना'', उन्मेष प्रकाशन, नागपूर, आवृत्ती प्रथम.

८. खरात शंकरराव, ''दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती'', इनामदार बन्धु प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, मार्च, १९७८.

९. डॉ. ठाकूर रविंद्र, ''मराठी ग्रामीण कादंबरी'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३०, आवृत्ती प्रथम नोव्हेंबर १९९३.

१०. डॉ. डोळस वसंत, ''दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप'', दिलीपराज प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली १९९२.

११. देशपांडे कुसुमावती, ''मराठी कादंबरीचे पहिले शतक'', मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, आवृत्ती दुसरी १९७५.

१२. नेमाडे भालचंद्र, ''टीका स्वयंवर'', सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती प्रथम १९९०.

१३. संपादक, पवार गो. म., हातकणंगलेकर म. द., ''मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप'' (१९५०-१९७५), पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., ताडदेव, मुंबई, पहिली आवृत्ती १९८६

१४. पानतावणे गंगाधर, ''प्रबोधनाच्या दिशा'', नंदिता प्रकाशन, वर्धा.

१५. फडके ना. सी., ''प्रतिभा साधन'', देशमुख आणि कंपनी, पुणे २, आवृत्ती सातवी, जानेवारी १९६०.

१६. फडके भालचंद्र, ''दलित साहित्य वेदना व विद्रोह'', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, आवृत्ती तिसरी, नोव्हेंबर २०००.

१७. प्रा.बापट गोडबोले, ''मराठी कादंबरी तंत्र आणि विकास'', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी १९७३.

१८. यादव आनंद, ''१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती प्रथम, मार्च २००१.

१९. संपा. लिंबाळे शरणकुमार, ''शतकातील दलित विचार'', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., २५१, शनिवार पेठ, पुणे, ३०, आवृत्ती प्रथम, १५ जुलै २००१.

२०. डॉ. वाघमारे जनार्दन, ''साहित्य चिंतन'', प्रतिमा प्रकाशन, आवृत्ती प्रथम १९९२.

२१ वाघमारे दि. रा , ''आंबेडकरी धम्म एक आकलन'', निर्मल प्रकाशन, नांदेड, आवृत्ती प्रथम १४ एप्रिल १९९५.

२२. डॉ. सानप किशोर, ''मराठी कादंबरीतील नैतिकता'', बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, आवृत्ती प्रथम १९९८.

२३. डॉ. सानप किशोर, ''प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर'', बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९८.

२४. सोमवंशी बी. सी., ''बौध्दधर्मीय मातंग'', आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९८.

२५. प्रा. संत जान्हवी, ''कादंबरी एक वाङ्मय प्रकार'', मोघे प्रकाशन, कोल्हापूर - २, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९७१.

२६. हस्तक उषा, ''साहित्य : अध्यापन आणि प्रकार'',

**नियतकालिके :-**

१. अनुष्टुभ, जाने.-फेब्रु. २०००

२. अस्मितादर्श, दिवाळी अंक, दलित स्त्री विशेषांक १९८१

३. अक्षरवैदर्भी - १९८६-८७, १९८७-८८.

४. प्रतिष्ठान, नोव्हे.-डिसें. १९९८.

५. ललित, जून - १९९४

६. विदर्भरंग, दिवाळी अंक, २००१.

७. साहित्यसूची, मे १९९७